बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३१८ ▪ सोमवार, दि. ३० मार्च, २०२६ ▪ पोस्टल दिनांक ३१ मार्च, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-318 ▪ Monday 30 March, 2026 ▪ Postal Date 31 March, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

सायं.दैनिक

www.beedkisan.in

# बीड किसान

• संपादक : शेख कामरान • BEED KISAN


**बीड जिल्हा**

## सौर ऊर्जा, पवनचक्क्या प्रकल्प भरमसाठ तरीही

# शेतकऱ्यांच्या नशिबी किर्र अंधारात दारे धरण्याची वेळ

### शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा केवळ दिवा स्वप्न जिल्ह्यातील या प्रकल्पातून नेमका वीजपुरवठा किती?

**बीड । किसान न्युज**

**जिल्ह्यात सौर ऊर्जा प्रकल्प आणि पवनचक्क्या मोठ्या प्रमाणात उभ्या झालेल्या आहेत व होत आहेत. मात्र हे भरमसाठ प्रकल्प उभे राहिले असताना ही मात्र शेतकऱ्यांच्या नशिबी रात्री किर्र अंधारात जीव धोक्यात घालून पिकांना पाणी देण्यासाठी दारे धरावे लागत आहे. शासनाने शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा देण्याची घोषणा करुन ही भरमसाठ प्रकल्प उभे राहत असतानाही शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा हे दिवा स्वप्न ठरत आहे. यामुळे हे प्रकल्प केवळ कंपन्या आणि गुत्तेदार पोसण्यासाठीच आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या प्रकल्पातून नेमकी किती वीजनिर्मिती होते हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**



विजेची वाढती मागणी आणि पुरवठा आणि वीज निर्मितीसाठी पारंपरिक पद्धती सोबतच वीज निर्मिती वाढवून गरज भागविण्यासाठी शासनाने सौरऊर्जा आणि पवनचक्क्यांचा मार्ग अवलंबला असून, नैसर्गिक साधनांचा वापर करण्यात येत आहे. या अंतर्गत बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी सौरऊर्जा आणि पलनचकी प्रकल्प उभे करण्यात आले. हे प्रकल्प टाटा पॉवर, पनामा, आवादा, सुझलॉन अशा मोठ्या कंपन्या उतरल्या आहेत. यासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे. पण याचा म्हणावा तसा फायदा होताना दिसत नसून, विजेची समस्या कायमच आहे. शासनाने शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा देण्याची घोषणा केली आहे. ज्या ठिकाणी सौरऊर्जा अथवा पवनचक्की प्रकल्प उभे करताना शेतकऱ्यांना समोर करीत दिवसा वीजपुरवठा मिळणार असा दावा केला जातो पण अद्याप तरी शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा कुठे सुरू आहे याची माहिती मिळत नाही. आजही शेतकरी रात्रीच्या किर्र अंधार पिकांना जगविण्यासाठी रात्रभर जागून दारे धरताना दिसत आहेत. यामुळे या भरमसाठ प्रकल्प केवळ नावालाच दिसत आहेत. यामुळे हे प्रकल्प केवळ या मोठ्या कंपन्या » पान २ वर

### या प्रकल्पातून गुन्हेगारी वाढल्याचे चित्र

**पवनचक्क्या आणि सौरउर्जा प्रकल्पातून नफेखोरी कमावण्यासाठी अनेकजण शेतकऱ्यांना दमदाटी करुन कमी रकमेत जमीन खरेदी करीत आहेत. ते कंपन्यांच्या घशात घालत आहेत. तसेच कंपन्यांकडून खंडणी वसुली असे ही प्रकार घडत असून, यामुळे बीड जिल्ह्यात काही प्रमाणात गुन्हेगारी आणि गुंडगिरी वाढल्याचे चित्र असून, यातून वीज तर मिळाली नाही मात्र टोळक्यांची दहशत निर्माण झाल्याची उघड चर्चा आहे.**

### जिल्ह्याला पुरेल इतकीही वीज निर्मिती नाही!

**बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये मागील काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात सौरऊर्जा आणि पवनचक्की प्रकल्प उभे राहिले आहेत. यातून सध्या १८० ते २१० मेगावॅट वीजनिर्मिती होत असल्याचे सांगितले जात आहे. पण जिल्ह्याला दररोज २८० ते ३४० मेगावॅट विजेची गरज आहे. मग निर्मीत पाहता या भरमसाठ प्रकल्पातून जिल्ह्याची ही गरज भासत नसेल तर शेतकऱ्यांना कसा फायदा मिळणार हा प्रश्नच आहे. यामुळे शासन केवळ उद्योजक पोसण्यासाठी हे प्रकल्प उभे करत आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**



## मातृत्वाचा झरा

### स्व. केशर काकू क्षीरसागर यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**बीड जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रावर ठसा उमटवणाऱ्या केशर काकू क्षीरसागर यांची जयंती म्हणजे केवळ एका नेत्याच्या स्मरणाचा दिवस नाही, तर मातृत्व, समर्पण आणि लोकसेवेच्या मूल्यांना उजाळा देण्याचा प्रसंग आहे.**

केशर काकूंनी आपल्या राजकीय प्रवासात पद, प्रतिष्ठा किंवा सत्तेच्या मोहापेक्षा माणुसकीला अधिक महत्त्व दिले. बीड जिल्हा हेच आपले कुटुंब आहे, अशी त्यांची भूमिका होती. याच भावनेतून त्यांनी सर्व जाती-धर्मातील लोकांना सोबत घेतले आणि एकात्मतेचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या कार्यपद्धतीत कोणताही भेदभाव नव्हता; प्रत्येक व्यक्ती त्यांच्या दृष्टीने कुटुंबातील सदस्यच होता. गाव पातळीपासून ते संसदपर्यंतचा त्यांचा प्रवास हा संघर्ष, चिकाटी आणि लोकाभिमुखतेचा आदर्श ठरतो. तीन वेळा खासदार म्हणून त्यांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले. नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाची त्यांनी मेड रोवली आहे. तसेच अंबाजोगाई येथील दूरदर्शन , बीडचे आकाशवाणी केंद्र उभे करणे तसेच शिक्षण, सहकार आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांत त्यांनी उभारलेली कामगिरी आजही प्रेरणादायी आहे. अनेक शैक्षणिक संस्था स्थापन करून त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानाची दारे खुली करून दिली. केशर काकूंच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात ठळक पैलू म्हणजे त्यांचे मातृत्व. राजकारणात असताना त्यांनी केवळ नेतृत्व केले नाही, तर लोकांना आपल्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणे जपले. त्यांच्या या ममत्वपूर्ण स्वभावामुळेच त्या काकू म्हणून जनमानसात घर करून राहिल्या. संकटात असो वा आनंदात, प्रत्येकाच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हेच त्यांचे वैशिष्ट्य होते. आजच्या राजकारणात वाढत चाललेली दुराव्याची भावना आणि मतभेदांच्या पार्श्वभूमीवर केशर काकूंचा आदर्श अधिकच महत्त्वाचा ठरतो. समाजाला एकत्र ठेवण्याची ताकद, सर्वसमावेशकता आणि निःस्वार्थ सेवा हीच खरी त्यांची ओळख होती. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करूया. बीड जिल्ह्याला कुटुंब मानणाऱ्या या मातृसमान नेत्या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या कार्याची ऊब आणि प्रेरणा कायम आपल्या सोबत आहे. **स्व. केशर काकू क्षीरसागर यांना विनम्र अभिवादन!**

## विद्युत तार चोरताना टॉवर कोसळला; दोन चोरटे ठार

### परभणी येथे मृतदेह सोडून साथीदार पळून गेल्याने धक्कादायक घटना उघडकीस



**केज । किसान न्युज**

तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली असून हायव्होल्टेज विद्युत तार चोरी करण्याच्या प्रयत्नात अख्खा टॉवरच कोसळल्याने दोन चोरट्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर इतर साथीदारांनी अपघाताचा बनाव रचून मृतदेह परभणीला नेले, मात्र तिथे गेल्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा होऊन धक्कादायक घटना उघडकीस आली. पुणेयेथून पाच जणांची एक टोळी केज तालुक्यातील नांदूरघाट शिवारात तारा चोरण्याच्या उद्देशाने आली होती. शनिवारी रात्रीच्या सुमारास हे चोरटे हायव्होल्टेज टॉवरवर चढले आणि तारा कापण्याचे काम सुरू केले. मात्र, याच दरम्यान टॉवर जमिनीवर कोसळला. या भीषण दुर्घटनेत अविनाश पाटोळे आणि आकाश आडे या दोन चोरटे जागीच ठार झाले. या घटनेनंतर » पान २ वर

### टॉवर कोसळल्याने भीतीचे वातावरण

**सदरील टॉवर हे हायहोल्टेच विद्युत वाहिनीचे आहे. तो कोसळल्याने आश्चर्य व्यक्त केले जात असून, टॉवर उभारणीच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. टॉवर कोसळत असेल तर यामुळे शेतकऱ्यांना धोका निर्माण होऊ शकतो अशी भीती व्यक्त केली जात आहे.**

### घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाची भेट

टॉवर कोसळलेल्या घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाने भेट पाहणी करुन येथून काही नमुने तपासणीसाठी घेतले आहेत.

## शिरुर का.पंचायत समिती अधिग्रहण घोटाळा प्रकरणी

# चौकशी समिती नेमली पण अहवाल गुलदस्त्यात




### समिती प्रमुख म्हणतात अहवाल दिला तर घायाळ म्हणतात अहवालच आला नाही

**बीड । किसान न्युज**

शिरूर कासार पंचायत समितीच्या लेखाधिकाऱ्याने अधिग्रहण प्रकरणी देयके सादर करताना ऑनलाईन पद्धतीचा अवलंब न करता चेक द्वारे केला. यामुळे यामध्ये मोठी अनियमितता असल्याचं संशय व्यक्त करीत याबाबत तक्रार करण्यात आली. याची चौकशी करण्यासाठी तीन सदस्यीय समिती नियुक्त केली. यांना ७ दिवसांत अहवाल देण्याचे आदेश होते. मात्र दोन महिने उलटून गेले तरी अहवाल गुलदस्त्यात असून, समिती प्रमुख अहवाल दिल्याचे सांगतात पण संबंधित वरीष्ठ अधिकारी घायाळ म्हणतात अहवालच आला नाही. यामुळे नेमकं खरं कोण? हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत आहे का असा संशय व्यक्त केला जात आहे. शिरुर कासार पंचायत समितीचे लेखाधिकारी साबळे ए.एम. यांनी देयके सादर करताना ऑनलाईन प्रणालीद्वारे अदा न करणे, देयके एस.बी.आय बँक खात्यातील इतर लेखाशिर्षका मधील शिल्लक रक्कमेतून चेकद्वारे अदा केली आहेत, देयके पारित करताना सहाय्यक लेखाधिकारी यांची मान्यता व स्वाक्षारी घेतलीच नाही, अधिग्रहण लेखाशिर्ष २२१५ अंतर्गतआर्थिक तरतूद नसताना इतर लेखाशिर्षकातील शिल्लक नियमवाहय खर्च केली आहे. झेडपीएफएमएस प्रणालीद्वारे न » पान २ वर




**आंदोलनकर्त्यांच्या निवारा शेड, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष; जिल्हा प्रशासनाला 'तिरडी भेट' जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन गेल्या चार वर्षांपासून आंदोलनकर्त्यांसाठी निवारा शेड, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहे उपलब्ध करून देण्याची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. मात्र याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष दिले नसल्याने सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासनाला तिरडी भेट हे लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.**

## महाराष्ट्र पुन्हा हादरला; ४० महिलांचे लैंगिक शोषण

**मुंबई । किसान न्युज**



महाराष्ट्रात पुन्हा एकदा हादरवणारे प्रकरण समोर आले असून नवी मुंबईत एका भामट्याने तब्बल ४० महिलांची फसवणूक आणि लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. नाशिकमधील अशोक खरात प्रकरणानंतर हे दुसरे मोठे प्रकरण असल्याने राज्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आदर्श म्हात्रे (वय ३५) असे या आरोपीचे नाव असून तो स्वतःला कधी इस्त्रोचा शास्त्रज्ञ तर कधी आयपीएस-आयएएस अधिकारी असल्याचे भासवून महिलांना जाळ्यात ओढत होता. आदर्शची काम करण्याची पद्धत अत्यंत नियोजनबद्ध होती. तो मॅट्रिमोनी संकेतस्थळांवरून अशा महिलांचा शोध घ्यायचा ज्या अविवाहित, घटस्फोटीत किंवा विधवा आहेत. विशेषतः आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि वर्षाला २५ ते ३५ लाख रुपये कमावणाऱ्या महिलांवर तो लक्ष केंद्रित करायचा. स्वतःची » पान २ वर


SAVE TREE


### गरीब परिस्थितीवर मात; मानूर बहिरवाडीच्या

## सविता ढवळे यांची बीड पोलीस पदी निवड; गावकऱ्यांकडून भव्य सत्कार

**मानूर । किसान न्युज**

बहिरवाडी येथील सुपुत्री सविता परमेश्वर ढवळे हिची बीड पोलीस दलात निवड झाल्याबद्दल गावात तिचा भव्य सत्कार करण्यात आला. अत्यंत प्रतिकूल व गरीब परिस्थितीवर मात करत सविताने मिळवलेले हे यश परिसरासाठी प्रेरणादायी ठरत आहे. या सत्कार समारंभाला माजी आमदार साहेबराव दरेकर, मानूर गावचे उद्योगपती लिंबासेठ नागरगोजे, समाजसेवक कलंदर खान पठाण, माजी सैनिक संजू ढाकणे, उल्हास पाखरे, ठकसेन तुपे, आबा नागरगोजे, नामदेव कदम, तुपे सर, शिरसाठ सर तसेच राजमुद्रा अॅकॅडमीच्या संचालिका पांडुळे मॅडम यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सविता ढवळे हिच्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीचे कौतुक करत तिचा सत्कार केला. बहिरवाडीचे माजी पोलीस पाटील ढवळे, किसन बेळगे, विष्णू बडे यांच्यासह ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद व्यक्त केला. सविता ढवळे हिच्या या यशामुळे बहिरवाडी गावाचे नाव उज्ज्वल झाले असून, तिच्या पुढील वाटचालीस सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.





स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड

9850643058

सोने २४ कॅरेट 149,800

२२ कॅरेट 143,000

चांदी प्रतिकिलो 238,000



**पाहिजेत**

**दैनिक किसान कार्यालय, बीड**

येथे खालील पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

उप संपादक - १ पद | व्यवस्थापक - १ पद

वृत्तपत्र क्षेत्रातील अनुभव असल्यास उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल, संगणकाचे ज्ञान असणे बंधनकारक आहे.

पत्ता: सायं.दै.किसान कार्यालय, बशीरगंज बीड

संपर्क :: (9890460353 / 9730262660)


## सरस्वती बलभीमराव जाहेर पाटील यांचे निधन

**बीड । किसान न्युज**



सौ. सरस्वती बलभीमराव जाहेर पाटील (वय ७५वर्षे) यांचे अल्पशा आजाराने आज दि. ,२९ मार्च रोजी सायं. ६.०० वाजता दुःखद निधन झाले.त्या श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील यांच्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, एक मुलगा तसेच मुला-मुलींची नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे अंत्यसंस्कार उद्या सकाळी १०.०० वाजता नामलगाव घोसापूरी येथे करण्यात आले असून या मध्ये शहरातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते पाटील परिवारावर कोसळलेल्या या दुःखात साय दैनिक किसान परिवार सहभागी आहे.

## बीड जिल्ह्यातील मुस्लिम आरक्षण लढ्याला नवी दिशा

### मौलाना महमूद मदनी यांच्यासोबत महत्वपूर्ण चर्चा

**बीड । किसान न्युज**

**बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुस्लिम आरक्षण आंदोलनाला नवी दिशा मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. या पार्श्वभूमीवर जमीयत उलेमा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना महमूद मदनी यांची आज भेट घेऊन आरक्षणाच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या भेटीत बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुस्लिम आरक्षण अभियानाची माहिती देण्यात आली.**



समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी सुरू असलेल्या या लढ्याबाबत माहिती ऐकल्यानंतर मौलाना मदनी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, जमीयत उलेमा-ए-हिंद या आंदोलनाला सहकार्य करेल, असा विश्वास व्यक्त केला. भेटीदरम्यान जमीयत उलेमा-ए-हिंदच्या संग्रहालयालाही भेट देण्यात आली. या संग्रहालयातून भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत संघटनेने बजावलेली भूमिका, त्याग आणि ऐतिहासिक योगदान यांचा आढावा घेण्यात आला. स्वातंत्र्य लढ्यातील हा इतिहास अनुभवताना अभिमानाची भावना व्यक्त करण्यात आली. यावेळी देशातील मुस्लिम समाजाच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक स्थितीवरही सखोल चर्चा झाली. समाजाच्या प्रगतीसाठी सर्व घटकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे मत मौलाना मदनी यांनी व्यक्त केले. तसेच या विषयांवर त्यांनी गंभीर चिंता देखील व्यक्त केली. या बैठकीमुळे बीड जिल्ह्यातील मुस्लिम आरक्षणाच्या लढ्याला बळ मिळणार असून, विविध संघटना व समाजघटक एकत्र आल्यास सकारात्मक बदल घडू शकतो, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.